# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मचिंतन

**डॉ. सर्जेराव सदाशिव जाधव** पदवी व पदव्युत्तर मराठी विभागप्रमुख यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर. ता. पन्हाळा जि. कोल्हापूर. भ्रमणध्वनी : ८९७५७५६९०० ई-मेल : sjadhav.3034@gmail.com

---

**प्रस्तावना** : २० वे शतक हे अनेक समाज सुधारणांच्या चळवळीनी भारलेले शतक आहे. एकूणच सामाजिक सुधारणांमध्ये **'अस्पृश्यता निवारण'** ही एक महत्त्वाची सुधारणा होती. भारतीय समाजाला लागलेला अस्पृश्यता हा कलंक पुसून टाकला पाहिजे असा विचार सर्वच समाज सुधारकांच्या कार्याच्या आणि चळवळीच्या अग्रस्थानी होता. या विचारावर उभारलेल्या सामाजिक सुधारणांबरोबरच अस्पृश्यता निवारण हा त्यांच्या कार्यप्रणालीचा एक महत्त्वाचा भाग बनला होता. आपल्या विचाराची आणि कृतीची सांगड घालीत अनेक समाज सुधारक या सामाजिक सुधारणांच्या चळवळीला आणि सुधारणांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या बळ देत होते. या समाजसुधारकांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अतिशय निष्ठेने आपल्या अनुभवाच्या आधारावर गुलामगिरीच्या बंधनातून अस्पृश्यांना मुक्त करण्यासाठी, त्यांना जागृत व संघटित करण्यासाठी, शिक्षणाच्याद्वारे त्यांच्यात नवविचारांचा प्रचार करण्यासाठी, त्यांना आत्मसन्मानाचा नवीन मार्ग दाखविण्यासाठी अविरत परिश्रम घेत होते. आपण उच्चविद्याविभूषित झाल्यानंतर कुठल्याही आर्थिक प्रलोभनांचा स्वीकार न करता बाबासाहेबांनी आपले सर्व जीवन दलित बांधवांच्या उन्नतीसाठी समर्पित केले हे जगद्विख्यात आहे.

'अस्पृश्यता निवारण' हा बाबासाहेबांच्या सामाजिक सुधारणांचा केंद्रबिंदू होता. अस्पृश्यतेच्या बाबतीत उच्चवर्णीय समाजाच्या विचार व आचार प्रणालीत काही बदल होण्याची शक्यता बाबासाहेबांना वाटत नव्हती. त्यामुळेच सामाजिक समतेच्या न्याय हक्कासाठी अस्पृश्यांना संघटित करणे व अहिंसक मार्गाने संघर्ष करण्यासाठी त्यांना प्रेरित करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे बाबासाहेबांना महत्त्वाचे वाटत होते. त्यातूनच त्यांनी महाडच्या चवदार तळ्यावरील सत्याग्रह व मंदिर प्रवेशाची चळवळ हाती घेतली. 'सत्याग्रह' या प्रभावी शस्त्राच्या द्वारे संघर्ष करणाऱ्या अस्पृश्यांना या चळवळीतून आत्मिक बळ मिळाले पण 'अस्पृश्यता निवारणाचे कार्य म्हणावे तसे साध्य होत नव्हते. अस्पृश्यता निवारण आणि अस्पृश्यांना मिळणारे दयनीय, मानहानीकारक जीवन बदलेल ते केवळ शिक्षणामुळेच हे ओळखून बाबासाहेबांनी २० जुलै १९२४ रोजी 'बहिष्कृत हितकारणी सभा' स्थापन केली. १९४६ मध्ये त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीची' स्थापना केली. या संस्थेच्या वतीने मुंबई व औरंगाबाद येथे महाविद्यालये व वस्तीगृहे स्थापन करून त्यांनी दलित बांधवांमध्ये शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार केला. हे करताना त्यांनी अस्पृश्य व्यक्तीही उच्चविद्याविभूषित होऊ शकते हे तत्व आपल्या उदाहरणाद्वारे समाजासमोर मांडले.

शिक्षणाचा योग्य प्रचार व प्रसार झाला असला तरी केवळ शिक्षणाद्वारे अस्पृश्यता, जातीसंस्थेचे उच्चाटन होणार नाही याचा अंदाज आल्यावर डॉ. बाबासाहेबांनी समाजाच्या विकासाला चालना देणारे वृत्तपत्रासारखे माध्यम निवडून त्याद्वारे त्यांनी अस्पृश्यांवर होणारे अन्याय व अत्याचार समाजासमोर मांडले. लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराज यांनी १९२० मध्ये केलेल्या आर्थिक सहकार्यातून बाबासाहेबांनी **'मूकनायक'** हे वृत्तपत्र सुरू केले. बाबासाहेबांच्या इंग्लंडला जाण्याने हे वृत्तपत्र पुढे बंद पडले. तिथून परतल्यावर बाबासाहेबांनी १९२७ मध्ये **'बहिष्कृत भारत'** हे पाक्षिक सुरू केले. लगेचच वर्षभराने समता संघातर्फे **'समता'** हे पत्र सुरू केले याशिवाय बाबासाहेबांनी **'जनता' व 'प्रबुद्ध भारत'** ही वृत्तपत्रेही चालवली. ही सर्वच वृत्तपत्रे दीर्घकाळ चालली नाहीत'. पुढे त्यांनी अस्पृश्य समाजाला नवविचारांची. तत्त्वाची जाणीव व्हावी या भूमिकेतून ग्रंथलेखनही केले.

बाबासाहेबांच्या शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांचे राजकीय कार्य ही महत्त्वाचे आहे. गव्हर्नरच्या कायदे कौन्सिलचे सभासद असताना, ब्रिटिश शासनाबरोबर धोरण ठरविताना, कायदामंत्री म्हणून काम करताना, भारतीय राज्यघटनेचा आराखडा ठरविताना आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या हक्कासाठी असलेली वचनबद्धता कधी सोडली नाही. देशाच्या राजकारणात प्रत्यक्ष भाग घेऊन त्यांनी राजकीय सुधारणाही घडवून आणण्याचे कार्य केले. इतके करूनही हिंदू धर्मात अस्पृश्यांना माणुसकीचे अधिकार मिळणार नाहीत हे जाणून बाबासाहेबांनी बौद्धधर्माच्या मूळ ग्रंथांचा विस्तृतपणे व बारकाईने २० वर्ष अभ्यास करून, त्यांचे सर्व गुण-दोष समजावून घेऊन १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथील ऐतिहासिक समारंभात आपल्या असंख्य अनुयायांसह धर्मांतर करून समतेची पाठराखण करणारा बौद्ध धर्म स्वीकारला. पुढे ६ डिसेंबर १९५६ मध्ये बाबासाहेबांचे महापरिनिर्वाण झाले. बाबासाहेबांच्या या सर्वांगीण कार्याबरोबरच त्यांचे धर्मचिंतन कसे होते हा या संशोधनाचा मुख्य विषय आहे.

**डॉ. बाबासाहेबांचा जीवनपट :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी हिंदू धर्मात अस्पृश्य मानल्या जाणाऱ्या (महार) जातीत इंदूर जवळील **'महू'** येथे झाला. त्यांचे मूळ नाव सपकाळ. बाबासाहेबांचे वडील लष्करात सुभेदार होते. त्या काळात अस्पृश्य वर्गाला अत्यंत अपमानाने व बहिष्कृत म्हणून वागवले जात असल्याने बाबासाहेबांना शिकण्यासाठी फारच हाल व कष्ट उपसावे लागले. अस्पृश्यांचे होणारे सर्व मानभंग, अपमान, हाल, तिरस्कार त्यांना स्वतःला खूपच अनुभवायाला मिळाले. पण त्यांच्यापाशी विलक्षण तीव्र बुद्धिमत्ता, जिद्द व शिकण्याची उत्कट इच्छा असल्याने सर्व अडचणींवर मात करून त्यांनी शिक्षण घेतले. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा शहरात झाले. तेथे शिकत असताना त्यांना एक प्रेमळ गुरुजी मिळाले. त्यांनी बाबासाहेबांना 'सपकाळ' या नावाऐवजी आपले स्वतःचे 'आंबेडकर' हे नाव लावायला सांगितले. अशा रीतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर बनले. मुंबईच्या एल्फिन्स्टन महाविद्यालयातून ते बी.ए. झाले. पुढे ते सयाजीराव गायकवाड यांच्या बडोदा संस्थानात नोकरीस लागले. तेथे त्यांना बडोदा सरकारकडून परदेशात जाऊन उच्चशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर झाली. शिष्यवृत्ती घेऊन ते अमेरिकेत गेले. अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात त्यांनी 'अर्थशास्त्र' विषय घेऊन एम. ए. ची पदवी संपादन केली. तेथेच त्यांनी आपली पीएच.डी. ही उच्चविद्याविभूषित अशी सर्वोच्च पदवी संपादन केली. पुन्हा त्यांनी इंग्लंडला जाऊन अर्थशास्त्र विषयात लंडन विद्यापीठाच्या एम. एस्सी. डीएस्सी. आणि बरिस्टर या पदव्या संपादन केल्या. अशा रीतीने त्याही काळात डॉ. बाबासाहेब या तरुणाने श्रम व चिकाटीच्या जोरावर अनेक शैक्षणिक पदव्या व मानाची पदे संपादन केली. परदेशातून शिक्षण घेऊन भारतात परतल्यावर ठरल्याप्रमाणे ते बडोदा संस्थानाच्या सेवेत रुजू झाले. उच्चविद्याविभूषित असूनही त्यांना बडोद्यात राहण्यास योग्य जागा मिळू शकली नाही. त्यांना अस्पृश्य म्हणून रहावयास कोणीच घर देत नव्हते. हा त्यांना मोठा अपमान वाटून त्यांनी बडोदा सकारातील पदाचा राजीनामा दिला व मुंबईला परतले.

आंबेडकर हे एक उच्च दर्जाचे अर्थशास्त्रज्ञ होते. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानवशास्त्र, मानववंशशास्त्र, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास व कायदा अशा अनेक विषयात त्यांनी विशेष प्राविण्य मिळवून आपल्या विद्वतेने जगात लौकिक मिळवला. मुंबईत बॅरिस्टर म्हणून वकिली व्यवसाय सुरू केला. तेथेही त्यांना अस्पृश्यतेचे चटके बसले. मुंबईत सिडनेहम कॉलेजमध्ये चार वर्ष प्राध्यापकाची नोकरी केली. नंतर ते मुंबईच्या सरकारी लॉ कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले. त्याच कॉलेजचे पुढे ते प्राचार्यही झाले. एक उत्तम प्राध्यापक व विद्वत्तापूर्ण प्राचार्य असा नावलौकिक प्राप्त केला. १९४६ साली ब्रिटिशांनी भारतावरील आपली सत्ता सोडण्याची घोषणा केल्यानंतर घटना समितीची स्थापना करण्यात आली. या समितीवर बंगाल प्रांतातून बाबासाहेब निवडून आले. घटनेचा मसुदा तयार करण्यासाठी नियुक्ती केलेल्या समितीचे प्रमुखपद बाबासाहेबांना देण्यात आले. या समितीचे कार्यही तीन वर्षे चालले. बाबासाहेबांनी जगातील अनेक राष्ट्रांच्या घटनांचा अभ्यास करून भारताच्या घटनेला एक आदर्श असे रूप दिले. पुढे ते राजकारणातील मतभेदामुळे बाजूला झाले. संपूर्ण जीवनभर अस्पृश्यतेचे चटके सोसावे लागल्याने त्यांनी हिंदू धर्म त्यागण्याचा निर्णय घेतला आणि १९५६ साली म्हणजे मृत्यूपूर्वी एक-दोन महिने अगोदर बौद्ध धर्मात प्रवेश केला. समाजाच्या सर्वांगीण क्षेत्रात आपल्या विद्वत्तापूर्णतेने चौरस फेरफटका मारणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ६ डिसेंबर १९५६ ला महापरिनिर्वाण झाले. १४ एप्रिल १९९० रोजी त्यांना मरणोत्तर **'भारतरत्न'** या सर्वोच्च पुरस्काराने गौरविण्यात आले.

**धर्मचिंतन संकल्पना** : 'धर्म' या शब्दाचा अर्थ संस्कृत भाषेत **"शाश्वतमार्ग"** असा होतो आणि त्याचा शब्दार्थ आहे जे धारण करण्यास योग्य आहे तो म्हणजे धर्म. जीवनाच्या सर्वोत्तम पद्धतींचा संग्रह म्हणजे धर्म असेही म्हणता येईल. थोडक्यात जे योग्य आहे, उचित आहे, चांगले आहे त्याला धर्म म्हणता येईल. जन्माला आलेल्या प्रत्येक मनुष्याला आपापलं कर्तव्य पार पाडणं हा त्याचा धर्म झाला.

विहितकर्मजन्योधर्मः। "निषिद्ध कर्मजन्यस्त्व धर्मः।" (तर्कसंग्रह)

या संस्कृत वचनाप्रमाणे धर्म आणि अधर्म हे अदृष्टाचे दोन प्रकार आहेत. धर्माला पुण्य व अधर्माला पाप म्हणून ओळखले जाते. श्रुतीने सांगितलेल्या गोष्टी करणे म्हणजे धर्म (पुण्य) आणि श्रुतीने निषिद्ध ठरवलेल्या गोष्टी करणे म्हणजे अधर्म किंवा पाप होय. धर्माविषयी श्रीशंकराचार्य म्हणतात - समाजव्यवस्था उत्तम राहणे, प्रत्येक प्राणिमात्राची ऐहिक आणि पारलौकिक उन्नती होणे या गोष्टी ज्यामुळे साध्य होतात तो धर्म होय.

**"धर्म"** या संकल्पनेची सुरुवात कुठून आणि कशी झाली याचा सखोल विचार केला तर प्रत्येक धर्मग्रंथात त्याची वेगवेगळी उत्तरे मिळतात. जगातील विविध धर्मांची सुरुवात एका छोट्या प्रदेशात झाली आणि काळाच्या वाटचालीत तो अन्यत्र पसरत गेला असा विचार सर्वानुमते पुढे आला. मानवाच्या समूह करून राहण्याच्या गुणधर्मातून समाजाची निर्मिती झाली आणि या समाजाला एकसंध ठेवणारी आणि आचरणाची दिशा दाखविणारी व्यवस्था म्हणून धर्म ही संकल्पना

अस्तित्वात आली. भारतीय तत्त्वज्ञान **धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष** या चार पुरुषार्थांशी निगडित आहे. सद्यस्थितीत हे चार पुरुषार्थ समजून घ्यायचे असतील तर पुरुषी मानसिकता सोडून द्यावी लागणार. कारण स्त्री आणि पुरुष यांनी आपापल्या क्षेत्रात केलेल्या सर्वोत्तम कामगिरीला पुरुषार्थ म्हटले जाऊ लागले. त्यापैकी धर्म हे त्यातील पहिले क्षेत्र आहे. त्याची निर्मिती समाजाच्या उत्कर्षासाठी झाली. भटक्या अवस्थेत राहणाऱ्या आदीमानवावरून ते अत्यंत प्रगतशील मानवापर्यंत सर्वांनाच धर्म व्यापून राहिला आहे. माणसाच्या या विकास क्रमांमध्ये त्याच्या जन्मापासून दोन गोष्टी त्याच्याबरोबर सतत राहिल्या आहेत त्यापैकी एक आहे धर्म आणि दुसरी आहे नीती. या दोन गोष्टींशिवाय माणूस राहूच शकत नाही. म्हणजेच मानवी जीवनात धर्म राहणारच. पण तो सामाजिक आणि व्यक्तिगत जीवनात कसा राहिला पाहिजे याचा विचार करणे आवश्यक आहे. धर्मभावनेचं सतत नव्याने परिष्करण होणे आवश्यक आहे. धर्माचा पुनःपुन्हा बदलत्या काळात नव्याने विचार व्हायला हवा. त्यातील कोणत्या गोष्टी टाकाऊ झाल्या आहेत व कोणत्या गोष्टी काळाला अनुरूप स्वीकारल्या पाहिजेत याचं एक सतत परिष्करणात्मक आंदोलन चालवायची गरज आहे. धर्म हा समाजाला पोषक व्हायला

पाहिजे पण ज्या ज्या वेळी याच्या उलट घडू लागले त्या त्या वेळी या धर्मसंस्थांविरुद्ध बंडं झालेली पाहायला मिळतील. त्यामध्ये **बुध्दांच्या आणि महावीरांच्या** बंडांचा उल्लेख करता येईल. क्षेत्रीय समाजातून आलेल्या या दोघांनी धर्माविरुद्ध बंड केलेले आहे आणि हिंसेला अहिंसेने उत्तर दिलेले आहे. पुढील काळात धर्माचे परिष्करण होताना **राजा राममोहन रॉय** यांचा ब्राह्मोसमाज, **न्यायमूर्ती रानडे** आणि **भांडारकरांचा** प्रार्थनासमाज, **महात्मा फुलेंचा** सत्यशोधक समाज, **दयानंद** यांचा आर्यसमाज अशी धार्मिक बंडंही झालेली पाहायला मिळतात. या पार्श्वभूमीवर धर्माचा जरा वेगळ्या पद्धतीने विचार केला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी. आपल्या तत्वज्ञानाची मुळे धर्मात असल्याचे ते सांगतात. मानवी समता प्रस्थापित करण्याचे काम बाबासाहेबांचा धर्मविचार करतो. या सर्व पार्श्वभूमीवर डॉ. आंबेडकर धर्माविषयी कसे चिंतन करतात हे पाहणे म्हणजे बाबासाहेबांचे धर्मचिंतन समजून घेणे होय.

**धर्माधिष्ठित मानवी जीवन :** सकल मानवी जीवनाच्या उत्कर्षासाठी धर्म अत्यावश्यक असतो हे बाबासाहेबांनी जाणल्यामुळे या जाणीवेतूनच त्यांनी धर्मांतर केले असावे असे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही. याविषयी महाराष्ट्रातील प्रबोधनकारांचे गाढे अभ्यासक गजानन जोशी म्हणतात – "धर्माने आशा व उत्साह प्राप्त होतो, आणि तो माणसाच्या शारीरिक व वैषयिक उपभोगांवर मानवाला संतुष्ट न राहू देता बुद्धीच्या व अंतःकरणाच्या उन्नतीसाठी प्रेरणा देतो, मनाला स्वार्थातून व संकुचिततेतून बाहेर काढतो, आणि प्रेम व करुणा यांची वृद्धी करून अखिल मानवजातीशी समरस होण्यास प्रेरणा, उत्साह व बळ देतो. म्हणून आंबेडकर हे तसे पाहिले तर खऱ्या धर्मभावनेच्या विरुद्ध नव्हते. तसे ते असते तर त्यांनी हिंदू धर्माचा त्याग केल्यावर ते धर्मविरहित राहिले असते; पण त्यांना सद्धर्म-सध्धम्म पाहिजे होता आणि त्यांना बौद्धधर्म असा सध्धम्म वाटला. बौद्धधर्माचे वैशिष्टय त्यांनी ओळखले आणि इतर धर्मांशी तुलना केल्यावर त्यांना बौद्धधर्म हाच सर्वश्रेष्ठ धर्म वाटला म्हणून त्यांनी बौद्धधर्मात धर्मांतर केले किंवा खऱ्या अर्थाने स्वधर्मी बनले. (महाराष्ट्रातील प्रबोधनकार : प्रा. डॉ. गजानन नारायण जोशी. पृष्ठ १९०)

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मचिंतन** म्हणजे भारतीय समाजातील विषमतेच्या विरुद्धची विचारप्रवृत्ती आणि धर्माच्या आधारे मानवतेला नव्याने समजून घेण्याचा एक प्रयत्न होता. त्यांनी धर्माला मानवाच्या मुक्तीचे साधन मानले, परंतु धर्माचे स्वरूप काय असावे यावर त्यांचा विशेष भर होता. आंबेडकरांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेला प्रखरपणे विरोध केला. त्यांना वाटत होते की, जातीव्यवस्था ही माणसामाणसांतील विषमता वाढवते आणि धर्माचा खरा अर्थ व उद्देश हरवून बसते. त्यांच्या मते धर्माने मानवाला एकत्र आणले पाहिजे, त्याला स्वातंत्र्य, समानता, आणि बंधुता दिली पाहिजे. परंतु, जातिव्यवस्था हे उद्दिष्ट पूर्ण करत नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. बाबासाहेबांचे धर्मचिंतन बौद्ध धर्माच्या प्रभावाखाली होते. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला कारण बौद्ध धर्मात अहिंसा, करुणा, आणि समानतेला महत्व दिले आहे. त्यांच्या मते, बौद्ध धर्माने मानवतेला नवा मार्ग दाखवला आहे जो एक सामाजिक आणि आध्यात्मिक मुक्तीचा मार्ग आहे.

बाबासाहेबांनी सांगितलं की धर्म हा केवळ श्रद्धा आणि उपासनेचा भाग नसून, तो समाजाच्या सुधारणेसाठी आणि व्यक्तीच्या कल्याणासाठी कार्य करायला हवा. धर्माने व्यक्तीला नैतिक आधार द्यावा आणि त्याच्यावर समाजाच्या कल्याणाचे दायित्व टाकावे. पण हे फलद्रूप होत नसल्याच्या करणातून बाबासाहेबांनी १९५६ मध्ये हिंदू धर्मातून धर्मांतर करून लाखो अनुयायांसह बौद्ध धर्माचा अंगीकार केला. बौद्ध धर्माच्या तत्त्वांनुसार मानवतेची समानता, बंधुता, आणि अहिंसा यांचा प्रचार केला. त्यांना वाटले की हा धर्मच भारतीय समाजातील असमानता आणि शोषण दूर करू शकेल.

आंबेडकर यांचे धर्मचिंतन म्हणजे एक व्यापक सामाजिक, नैतिक, आणि आध्यात्मिक दृष्टिकोन आहे, ज्याचा उद्देश समाजात समता, न्याय, आणि बंधुत्व या तत्त्वांचा प्रसार करणे हा होता. आपली त्रिसूत्री समाजात रुजविण्यासाठी अविश्रांत

परिश्रम घेणारे बाबासाहेब हे वैज्ञानिकतेचा, बुद्धिप्रामान्यवाद, वास्तववाद आणि व्यावहारिकतेचा पुरस्कार करीत असले तरी ते धर्माच्या विरुद्ध नव्हते किंबहुना त्यांची संपूर्ण जीवनयात्राच धर्मप्रधान विचाराची होती जिची परिणती शेवटी बुद्धाच्या धम्मातच समायोजित झाली. असे असले तरी हिंदू धर्ममार्गावरील त्यांचा प्रवास सुखकारक न होता अस्पृश्यतेचे चटके सोशीत सोशीतच झाला. या प्रत्येक चटक्यागनिक त्यांचा हिंदू धर्मावरील राग वाढत वाढत जाऊन त्याचे विसर्जन शेवटी त्यांनी केलेल्या धर्मांतरात झाले. **गौतम बुद्ध, संत कबीर आणि म. जोतीबा फुले** या तिघांना बाबासाहेब आपले गुरु मानीत. बाबासाहेबांचे वडील रामजी हे कबीरपंथी असल्याने कबीराच्या शिकवणीचा प्रभाव बाबासाहेबांच्या बालमनावर लहानपणीच खोलवर रुजला होता. या संस्कारातून परिपक्व झालेल्या बाबासाहेबांचे मन पुढे हळूहळू बौद्धधर्माकडे ओढ घेऊ लागले.

बुद्धाच्या विचारांचाही बाबासाहेबांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. या परिणामातून बुद्धाच्या शिकवणीचा आणि विचारांचा स्वीकार केला तर जगाचे कल्याण होईल असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण होऊ लागला. यातूनच त्यांनी बुद्ध, फुले आणि कार्लमार्क्स यांच्या विचारांची पारायणे केली. बुद्धाने जगाला दाखविलेला चांगला मार्ग आणि मानवाची मनोधारणा बदलण्याचा केलेला प्रयत्न बाबासाहेबांना कळून चुकला. भौतिक सुखाला सर्वस्व मानण्यात धन्यता पावणाऱ्या मानवाला सन्मार्गावर आणण्याचा मार्क्सने केलेला प्रयत्न त्यांच्या लक्षात आला. या दोन टोकावर असलेल्या विचारांचा बाबासाहेब जेव्हा सखोल अभ्यास करतात तेव्हा ते एका विशिष्ट निष्कर्षाला पोचतात. बाबासाहेब म्हणतात – "बौद्ध तत्वज्ञान व मार्क्सवाद यांचा जेव्हा मी तौलनिक अभ्यास केला तेव्हा मी याच निष्कर्षाला पोहोचलो की जगातील एका फार मोठ्या सम समस्येच्या बाबतीत म्हणजेच जगात दुःख आहे व त्याच्या निवारणाचा एक निश्चित उपाय आहे, या बाबतीत बुद्धाचाच मार्ग सर्वोत्तम आहे, सुरक्षित आहे आणि भरभक्कम आहे." (डॉ. आंबेडकरांचे समाजचिंतन : १२४-१२८.)

धर्मासाठी माणूस की माणासाठी धर्म? या प्रश्नासंबंधी आंबेडकर आपली भूमिका मांडताना २९ जुलै १९२७ च्या 'बहिष्कृत भारत'मध्ये लिहितात, "नीतिशुद्ध आचरण ठेवण्याच्या जबाबदारीच्या दृष्टीने धर्मासाठी माणूस आहे आणि एकंदर समाजाच्या हिताचा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हाही धर्मासाठी माणूस आहे असे म्हणता येईल. परंतु धर्माच्या नावावर खपणा-या अधर्मासाठी विशिष्ट वर्गाच्या गुलामगिरीत खपण्यासाठी, पिढ्यान्पिढ्या अन्याय व जुलूम सोसण्यासाठी माणसाचा जन्म आहे, असे मात्र केव्हाही म्हणता येणार नाही. माणसाला धर्म आहे म्हणजे प्रत्येक मनुष्याला आपली ऐहिक उन्नती नीतिमार्गाने चालून संपादण्याला धर्माचे साहाय्य झाले पाहिजे." धर्माविषयी बाबासाहेबांचे सातत्यपूर्ण चिंतन सुरु होते. या चिंतनातून निर्माण झालेले धर्माचे सार ते संधी मिळेल तिथे अभिव्यक्त करीत होते. हिंदू विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसमोर भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, "स्वातंत्र्योत्तर तरुण पिढीला एका काखेत 'भारतीय राज्यघटना' आणि दुसऱ्या काखेत 'मनुस्मृती' सारखे हिंदू धर्मग्रंथ घेऊन वाटचाल करता येणार नाही. यांपैकी कोणते तरी एक फेकून द्यावे लागेल, याचा अर्थ स्पष्ट होता की, भारतीय राज्यघटनेला आपण सर्वश्रेष्ठ मानत असलो तर मग विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या 'मनुस्मृती'चा त्याग करणे अपरिहार्य आहे; पण स्वातंत्र्य मिळूनही आज जातिव्यवस्था, जातिप्रथा, जातीय अहंकार बळकट होत चालले आहेत. 'धर्मदास्य' वाढत आहे आणि त्यामुळे धर्मचिंतन दुर्मिळ होत चालले आहे. डॉ. आंबेडकर म्हणतात "ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही तो धर्म मला स्वतःला मान्य नाही." हिंदू धर्माची आणि हिंदू ग्रंथांची कठोर चिकित्सा करणारे त्यांचे लेखन हा त्यांच्या विचारसंपदेचा महत्त्वाचा भाग आहे. ते 'अवे फ्रॉम द हिंदूज' या आपल्या प्रकाशित लेखात बाबासाहेब म्हणतात, "धर्म हा मानवी मूल्ये विकसित करण्यासाठी अस्तित्वात आला आहे. धर्म हा मूलतः तत्त्वतः सामाजिक आहे. धर्म ही सामाजिक शक्ती आहे. धर्म माणसाच्या वैयक्तिक व सामाजिक व्यवहाराचे नियंत्रण करीत असतो. धर्माबद्दल त्यांच्या मनात अपरंपार आदर असतो. धर्माच्या नावाखाली युद्धे पेटविता येतात. धर्माचे आवाहन करून आपला स्वार्थही साधता येतो. धर्म हे हत्यारांप्रमाणे शोषणाचे प्रभावी हत्यार बनलेले आहे. डॉ. आंबेडकरांनी 'बुद्ध ॲण्ड हिज धम्म' या पुस्तकात आपल्या संकल्पनेला 'धम्म' मानले आहे.

**बाबासाहेबांचे धर्मावर आधारलेले तत्वज्ञान :** स्वातंत्र, समता आणि बंधुभाव **या तत्व**त्रयीवर बाबासाहेबांचे तत्वज्ञान उभारलेले आहे. या **तत्वत्रयी**पैकी **'समता'** या तत्वावर बाबासाहेब अधिक भर देतात. खऱ्या धर्माला समता आवश्यक आहे असे त्यांचे ठाम मत होते. खोट्या व अन्यायकारक धर्माला त्यांचा कडाडून विरोध होता. धर्म हा मानवाला आवश्यक असून तो सद्धर्म असावा असे त्यांना वाटते. बाबासाहेबांच्या मते- "खऱ्या धर्माने सामाजिक समतेचाच आग्रह धरला पाहिजे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आर्थिक, धार्मिक वा अन्य कारणांस्तव जे दुर्बल ठरत असतील अशांचे योग्यतम (Fittest), बलाढ्य, धनाढ्य, सत्ताढ्य लोकांपासून संरक्षण धर्माने करावयास पाहिजे. जो धर्म स्वतःच्या सुखाबरोबरच दुसऱ्याच्याही

सुखाची वाढ करण्याचा आणि कोणताही अन्याय व अत्याचार सहन न करण्याचा उपदेश करतो तो श्रेष्ठतम धर्म होय. भगवान बुद्धाचा धर्म म्हणजे माणसाच्या सत्प्रवृत्तीतून उद्भवणारा अत्यंत न्यायप्रधान असा धर्म आहे." (तत्रैव, पृष्ठ १५३-५४.)

**बाबासाहेबांनी सांगितलेली धर्माची लक्षणे :** बाबासाहेब हे वैज्ञानिक, बुद्धिप्रामान्य, वास्तववाद आणि व्यावहारिकतेचा पुरस्कार करतात. त्यांचे विचार, भावना या पूर्वग्रहदूषित नसतात. कोणत्याही प्रसंगाकडे, घटनेकडे ते तटस्थपणे पाहतात. त्याचे तर्कशुद्ध पुराव्यावर आधारित विवेचन करून प्राप्त होणारे निष्कर्ष ते स्पष्ट व सडेतोडपणे मांडतात. अशा दृष्टीकोनातून चिकित्सा करून त्यांनी धर्माची काही लक्षणे विशद केलेली आहेत.

१ धर्म बुद्धिनिष्ठ असला पाहिजे.

२ नैतिकतेच्या दृष्टीने धर्माने समाजावर आपली सत्ता चालवली पाहिजे.

३ धर्मातील मुलभूत तत्वे म्हणून स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यांना मान्यता असली पाहिजे.

४ प्रत्येक माणसाला एहिक जीवनात सुखासमाधानाने जगण्याची हमी धर्माने द्यावी.

५ कोणत्याही नियमांत धर्म बांधील नसावा.

६ धर्म हा समाजाचा आधारस्तंभ असावा.

७ धर्माने दारिद्र्याचे उदात्तीकरण करू नये इ.

**हिंदू धर्माविषयी डॉ.बाबासाहेबांच्या सूचना :** हिंदू धर्माच्या संरक्षणासाठी बाबासाहेबांनी काही मौलिक सूचना केल्या आहेत. अस्पृश्यता निराकरणासाठी सहभोजन, सहशिक्षण, मंदिरप्रवेश, नोकऱ्यांत सहभाग व आरक्षणाच्या सवलती यांसारखे जुजबी व वरवरचे उपाय बाबासाहेबांच्या मते पुरेसे नाहीत. हे उपाय मलमपट्ट्यांसारखे व म्हणून फसवे आहेत असे त्यांना वाटते. या बाबतीत बाबासाहेबांनी स्पष्ट शब्दांत म्हटले आहे "जर हिंदू धर्म हा अस्पृश्यांचाही धर्म असेल तर त्याला समताधर्म व्हावे लागेल. केवळ मंदिर-प्रवेशाचे कलम करण्याने हिंदुधर्म समताधर्म बनू शकत नाही. यासाठी स्पृश्य-अस्पृश्य, उच्च-नीच व जातिभेद यांचा जनक असलेला चातुर्वर्ण्यचा सिद्धान्त त्यांना नष्ट करावा लागेल. जर चातुर्वर्ण्यचा सिद्धान्त नष्ट केला जाण्याचा संभव नसेल तर अस्पृश्य लोक मंदिर- प्रवेशासह हिंदू धर्माचाही त्याग करतील. चातुर्वर्ण्य व जातिभेद हे हिंदू समाजाचे आधारभूत सिद्धान्त मानले जातात तोपर्यंत अस्पृश्यांकडे नीच दृष्टीने पाहणे बंद होणार नाही. जेव्हा हिंदुधर्मातून व हिंदुशास्त्रातून वर्णव्यवस्था व जातिभेद नष्ट केला जाईल तेव्हा अस्पृश्य स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यास तयार होतील." (तत्रैव, पृष्ठ ७१.)

**सारांश :** आंबेडकरांच्या चिंतनाचा विषय कोणताही असो त्याची प्रेरणा ही मानवमात्राविषयी व त्यातही दीनदलितांविषयी त्यांना असणाऱ्या असीम कळवळ्यातच होती. मग तो विचार धर्माचा असो, राष्ट्रवादाचा असो, लोकशाहीचा असो, समाजवादाचा असो, शासनाच्या कार्याचा असो की सामाजिक न्यायाचा असो. हरहुन्नरी प्रशासक, वस्तुनिष्ठ अभ्यासक, प्रज्ञावंत विधिज्ञ, सव्यसाची नेता व जबाबदार लोकप्रतिनिधी अशा अनेक भूमिका आंबेडकरांनी पार पाडल्या. पण त्यापैकी प्रत्येक भूमिकेवर त्यांच्या मानवतावादी विचारसरणीची ठळक छाप पडलेली दिसून येते. या मानवतावादाचे नाते मानवी विश्वाशी आहे. मानव आणि समाज यांच्यातील संबंधाशी आहे. त्यांच्या चिंतनाचा केंद्रबिंदू मानव आणि मानवच आहे, ईश्वरादी पारलौकिक गोष्टी नाहीत. त्यामुळे या देशाच्या कोट्यवधी अंतकरणांना हेलावून सोडण्याचे सामर्थ्य डॉ. आंबेडकरांच्या वाणीला आणि लेखणीला प्राप्त झाले.

**संदर्भग्रंथ : १** भारतीय तत्वज्ञानाचा बृहद इतिहास (खंड -१०) डॉ.भीमराव रामजी आंबेडकर प्रा. डॉ. गजानन नारायण जोशी, शुभदा सारस्वत प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती २००४

२ डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९८४

३ डॉ. मधुकर साळवे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची सामाजिक,राजकीय, धार्मिक चळवळ, नालंदा प्रकाशन, भोर पुणे, प्रथमावृत्ती २०१०.

४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे – संपादक शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य पुणे

५ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे- संपादक मा.फ.गाजरे, अशोक प्रकाशन,नागपूर.